<u>नियमित दिवाणी क्र. ७०/२०१५</u>
<u>नि.क्र. ३१ पुढे</u>

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक १— संतोष तारगे यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्रमांक २ व ३ करिता ॲड. श्री. चांदवडकर यांच्या मार्फत सुरुः</u>—**

१७. प्रतिवादी क्रमांक १ हे माझे वडील आहेत. ते गेल्या पंधरा वर्षापासुन कोणताही व्यवसाय करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ते टेलरिंगचा व्यवसाय करायचे. सन २०११ साली मी २० वर्षाचा होतो. त्यावेळेस मी शिक्षण घेत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रमांक २ व ३ ही माझी लहान भावंडे आहेत. ते देखील सन २०११ मध्ये शिक्षण घेत होते. आम्ही तिघे सध्या मिळेल ते काम करतो. मी रोजंदारीवर ऑफिसचे कारकुनचे काम करतो. दावा दाखल करतेवेळी मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता—यावर माझे वडीलांचे नाव कमी होवुन प्रतिवादी क्रमांक २ व ३ चे नांव लागल्याचे मी पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ मध्ये आम्ही शिक्षण घेत असल्यामुळे आमचे वडील काय व्यवहार करायचे याबाबत आम्हाला कोणतेही ज्ञान नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ मध्ये दावा मिळकतीचे साठेखत नोंदविले त्यावेळेस व दिनांक ०६.०६.२०१३ रोजी दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदविले त्यावेळेस ७/१२ उता—यावर माझी किंवा भांवाची नावे दाखल नव्हती. हे मला आठवत नाही की त्यावेळेस ७/१२ उता—यावर माझे वडीला व्यतिरिक्त जिजाबाई पांडुरंग खाडे यांचे देखील नाव दाखल होते. हे मला माहित नाही की, जिजाबाई पांडुरंग खाडे यांच्या नावासमोर १ हेक्टर २० अशी स्वतंत्र आणेवारी लागेलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये जिजाबाई पांडुरंग खाडे यांना पक्षकार म्हणून सामील केलेले नाही.

१८.	दावा मिळकत गट क्रमांक ५६८ व्यतिरिक्त माझे वडीलांच्या नावावर इतर कोणत्याही मिळकतीं नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, बारशिंगवेतील गट क्रमांक ५६५ ही मिळकत त्यावेळेस वडीलांच्या नावावर होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मी दावा मिळकतीच्या वाटपाची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील कोणताही व्यवसाय करत नव्हते त्यामुळे सन २०११ साली वडीलांनी दावा मिळकत माझे व भावांच्या शिक्षणाकरिता विक्रीस काढली होती. हे म्हणणे खरे नाही की, याबाबतची माहिती प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांना झाली आणि प्रतिवादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांच्यामध्ये दावा मिळकतीच्या विक्री संदर्भात साठेखत करारनामा झाला. हे मला माहित नाही की, सदर साठे करारनामा दिनांक १५.०१.२०११ रोजी नोंद क्रमांक ५०४/२०११ अन्वये इगतपुरी येथील दुयम निबंधक कार्यालयात नोंदविण्यात आला होता. हे मला माहित नही की त्याच दिवशी प्रतिवादी क्रमांक १ ने प्रतिवादी क्रमांक ३ च्या लाभामध्ये जनरल मुखत्यारपत्र लिहून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांना दावा मिळकतीच्या खरेदीख संपुर्ण भरणा मिळाला असल्यामुळे दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदविण्यात आलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत झाल्यापासुन दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांच्याकडे आहे.

१९.	हे मला माहित नाही की सन २०११ नंतर सन २०१५ पर्यनत दावा मिळकतीच्या किंमतीमध्ये बरीच वाढ झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्ही आमच्या वडीलासोबत संगनमत करुन प्रतिवादी क्रमांक २ व ३ विरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक २ व ३ हे प्रमाणिक खरेदीदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक १ हे दारुचे व्यसन करतात असा दाव्यामध्ये सरतपासात लिहिलेला मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्रमांक १ दारुचे व्यसन

करतात याबाबत अभिलेखात पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रमांक १ ने समजुन उमजुन दावा मिळकती संदर्भात साठेखत व जनरल मुखत्यारपत्र प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांच्या हक्कामध्ये लिहून दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दावा दाखल करण्याचा मला कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये केलेली मागणी करण्याचा आम्हाला कोणताही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे आणि आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

सही /—

स्थळः—इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांक १७.०९.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इगतपुरी,